महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, परभणी
District Deputy Commissioner Animal Husbandry
पत्ता : प्रशासकीय ईमारत, शिवाजी नगर परभणी. पिन क्रमांक : ४३१४०१, दूरध्वनी क्रमांक : (०२४५२) २९५२८८
Administrative Building, Shivaji Nagar, Parbhani 431401 Tel. 02452-295288
email-ddcahparbhani@gmail.com

## जाहिर लिलाव

निरूपयोगी दोषी द्रवनत्रपात्रे खरेदी करण्या-या इच्छुक व्यक्ती/खरेदीदार यांना सुचना देण्यात येते की, जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,परभणी जि.परभणी या कार्यालयांतर्गत निरूपयोगी,निर्लेखीत केलेली खालीलप्रमाणे विविध साईजची द्रव्रनत्रपात्रे जाहिर लिलावाव्दारे विक्री करावयाची आहेत. सदर द्रवनत्रपात्रे इच्छुकांना ज्या स्थितीत आहेत ज्या स्थितीत पाहण्यासाठी कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. लिलावाच्या साहित्याचा तपशील खालीलप्रमाणे---

| अक्र | लिलावाचा दिनांक | द्रवनत्रपात्रांचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | 12/03/2024 | टिए-55 | 89 |
| 2. | | टिए-11 | 03 |
| 3. | | बीए-20 | 03 |
| 4. | | बीए-3 | 67 |
| 5. | | आयआर-3 | 35 |
| 6. | | बीए-1.5 | 05 |
| | | **एकुण** | **202** |

त्याकरीता दिनांक 12 मार्च 2024 रोजी सकाळी 11.30 वाजता जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,दर्गा रोड परभणी येथे जाहिर लिलाव करण्यात येणार आहे. ज्या संस्था/कंपन्या/व्यापारी यांना निरुपयोगी द्रवनत्रपात्रे खरेदी करावयाची असतील अश्या संस्था/कंपन्या/व्यक्तींनीच भाग घ्यावा.भाग घेण्यासाठी इच्छुकांनी **जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी** यांचे नांवे रू.20,000/-(अक्षर रूपये वीस हजार केवळ)चा धनाकर्ष पेऐबल ॲट परभणी नांवे सादर करणे आवश्यक आहे. जाहिर लिलावासाठी गठित जिल्हास्तरीय समितीचा निर्णय अंतीम असेल. लिलावानंतर विक्री करावयाची सर्व द्रवनत्रपात्रे हि चेपून मगच हस्तांतरीत करण्यात येतील जेणे करून त्याचा पुर्नवापर करणे शक्य होणार नाही.लिलाव ज्याचे नांवे होईल त्यांनाच द्रवनत्रपात्रे चेपून घ्यावी लागतील याची नोंद घ्यावी.

**(डॉ.पी.पी.नेमाडे)**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,**
**परभणी**

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग

**जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, परभणी**

**District Deputy Commissioner Animal Husbandry**

पत्ता प्रशासकीय ईमारत, शिवाजी नगर परभणी. पिन क्रमांक : ४३१४०१, दूरध्वनी क्रमांक : (०२४५२) २९५२८८
Administrative Building, Shivaji Nagar, Parbhani 431401 Tel. 02452-295288
email-ddcahparbhani@gmail.com

**जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र,परभणी या कार्यालयातील भांडारातील निरूपयोगी निर्लेखन झालेल्या द्रवनपात्रांचा लिलाव दिनांक 12 मार्च 2024 रोजी सकाळी 11.30 वाजता निर्लेखीत द्रवनत्रपात्रांचय तपशिल खालील प्रमाणे आहे.**

| अक्र | लिलावाचा दिनांक | द्रवनत्रपात्रांचा प्रकार | संख्या |
|---|---|---|---|
| 1. | **12/03/2024** | टिए-55 | 89 |
| 2. | | टिए-11 | 03 |
| 3. | | बीए-20 | 03 |
| 4. | | बीए-3 | 67 |
| 5. | | आयआर-3 | 35 |
| 6. | | बीए-1.5 | 05 |
| | | **एकुण** | **202** |

## अटी व शर्ती

1. भाग घेणा-यास अनामत रक्कम रू. 20,000/- धनाकर्ष **" जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी "** यांचे नावे काढुन सादर करावा लागेल.
2. लिलावात सहभागी होणा-या बोलीधारकाने धनाकर्ष व इतर अनुषंगीक कागदपत्रे लिलावाचे ठिकाणी सादर करण्याची वेळ **दिनांक 11/03/2024 रोजी सकाळी 10.30 ते 17.00** वाजेपर्यंत असेल. त्यानंतर सहभागी होणा-या बोलीधारकांचे धनादेश व इतर कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.
3. सदरची रक्कम अयशस्वी लिलावधारकास लिलाव पुर्ण होताच परत करण्यात येईल.
4. यशस्वी लिलावधारकास अनामत रक्कम लिलावाची रक्कम पुर्ण भरल्यानंतर परत करण्यात येईल. यशस्वी लिलावधारकाने लिलावाची रक्कम रोख/आरटीजीएस किंवा धनाकर्षाने (डिडी) लिलावाच्या दिवशी किंवा दुस-या दिवशी भरणा करण्यात यावी लिलावाची रक्कम स्वतःयशस्वी लिलाव धारकांनी भरणा करावयाची असुन यशस्वी लिलावधारक इतर लिलावात भाग घेणा-या व्यक्ती/फार्मचा अनामत रकमेचा धनाकर्ष जमा करण्यास संमतीपत्र किंवा लेखीपत्र देऊन यशस्वी लिलावधारकाच्या रकमेत जमा करण्यात येणार नाही या बाबत स्पष्ठ नोंद घ्यावी.
5. लिलाव तीन वेळा पुकारल्यानंतर अंतिम निर्णय घेण्यात येईल.सर्व वस्तूंची मिळून बोली बोलावी लागेल विशिष्ट वस्तुसाठी बोली बोलता येणार नाही.
6. लिलावाध्ये ज्या बोलीधारकाची बोली सर्वाधिक असेल त्यांच्याच नांवाने लिलाव तिन वेळा बोली पुकारून लिलावास अंतिम मंजूरी देण्यात येइल.
7. अंतिम लिलाव ज्यांचे नांवे मंजूर होईल त्या व्यक्तीने लिलावाची संपुर्ण रोख रक्कम जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,कार्यालयत अथवा धनाकर्ष द्वारे लिलावाच्या दिवशी किंवा दुस-या दिवशी जमा करुनच लिलावातील द्रवनत्र पात्रांची उचल करावी. पुर्ण रक्कम जमा न केल्यास त्या व्यक्तीची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व सदरचा माल नंतरची जास्त बोली असलेल्या व्यक्तीस देण्यात येईल.त्याबाबतचा अधिकार समितीस राहिल.

   **रक्कम भरावयाचा खात्याचा तपशील खालीलप्रमाणे:-**

   जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी यांचे District Deputy Commissioner of Animal Husbandary Parbhani या नांवे स्टेट बँक ऑफ इंडिया,स्टेडियम शाखा,परभणी येथे असलेल्या खाते क्र.62002364012 आयएफएससी कोड SBIN0020016.
8. यशस्वी बोलीधांरकास रोख रक्कम भरावयाची असल्यास कार्यालयातील रोखपालाकडे भरुन शासकीय पावती घ्यावी.
9. अंतिम लिलाव ज्याचे नांवे मंजूर होईल त्यांनी लिलावातील संपुर्ण वस्तुंची वाहतूक स्वताःचे वाहनाने तीन दिवसाच्या आत करावयाची आहे.या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे वाहन,हमाल,मदतनीस मिळणार नाही तसेच लिलाव अंतिम

महाराष्ट्र शासन
पशुसंवर्धन विभाग
जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त, परभणी
District Deputy Commissioner Animal Husbandry
पत्ता : प्रशासकीय ईमारत, शिवाजी नगर परभणी. पिन क्रमांक : ४३१४०१, दूरध्वनी क्रमांक : (०२४५२) २९५२८८
Administrative Building, Shivaji Nagar, Parbhani 431401 Tel. 02452-295288
email-ddcahparbhani@gmail.com

करावयाची आहे.या कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे वाहन,हमाल,मदतनीस मिळणार नाही तसेच लिलाव अंतिम झालेल्या वेळेपासून मालाची प्रत्यक्ष वाहतूक करेपर्यंत लिलावाच्या वस्तूंचे संरक्षण,बोलीधारकाने स्वतः करावयाचे आहे. या कालावधीत लिलावातील कोणत्याही वस्तू गहाळ झाल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही.

10.लिलावामध्ये समाविष्ट असलेल्या वस्तु जशा आहेत तशाच व यथास्थितीत घ्याव्या लागतील.लिलावाच्या वस्तू अगोदरच पाहून घ्याव्यात नंतर कुठल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

11.लिलावात सहभागी होणा-याने स्वतःची ओळख,त्याचा पत्ता या पुष्टयर्थ कागदपत्रे सादर करावी लागतील उदा.**शॉप ॲक्ट लायसन्स,**पॅनकार्ड,आधारकार्ड,निवडणूक ओळखपत्र,वीजबील इ.

12. खरेदी दारांनी त्यांच्या पॅनक्रमांक व टॅन क्रमांकाची प्रत सादर करावी.

13. एखादया व्यक्तीस दुसऱ्याच्या वतीने अथवा कंपनी तर्फे बोली बोलायची असेल तर बोली बोलणाऱ्या व्यक्तीने ठरावीक नमुन्यात अधिकारपत्र ( पॉवर ऑफ अर्टर्नी ) दाखल करावी लागेल तरच बोली बोलता येईल. भगीदारी असेल तर भागीदार पत्राची सांक्षाकीत प्रत दाखल करवी लागेल तरच त्यांना बोली बोलता योईल.

14.लिलाव खरेदी दराने विक्री किंमतीचा भरणा राष्ट्रीयकृत बॅकेचा डी.डी. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त परभणी यांचे नावाने रोखीकृत होईल अशा तऱ्हेने काढावा. तसेच रोखन रक्कम भरणा करावयाची असल्यास जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी या कार्यालयात रोखपाल यांच्याकडे भरणा करुन शासकिय पावती सादर करण्यात यावी.वरील शर्ती व अटींचा भंग केल्यास एकुण खरेदी किमतीवर 10 टक्के आयकर लावण्यात येईल.

15.सर्व बोलीधारकास पॅन कार्डची तसेच सर्व कागदपत्रांचा छायांकित सत्यप्रत (Self Attested) देणे अवश्यक अहे.

16.लिलवची बोली रु.1000/- च्या पटीतच बोलावी लागेल.लिलवात सर्वात जास्त किंमतीची बोली समितीस मान्य असल्यास तिनदा बोलुन सदरची बोली निश्चित करण्यात येईल.

17.लिलाव मंजुर झाल्यानंतर सदर द्रवनत्रपात्राची राखण करण्याची जबाबदारी लिलाव घेणाराची राहील.

18.नैसर्गिक आपत्ती व इतर कोणत्याही करणामुळे लिलाव झालेल्या द्रवनत्रपात्राचे नुकसान झाल्यास विकत घेणारे/लिलाव घेणारे जबाबदार राहतील व हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

19.लिलवत अंतर्भुत द्रवनत्रपात्राची मोजणी/ नोंद नुसार असुन या मध्ये कमी/जास्त फरक असु शकतो.बोलीदाराने प्रत्यक्ष पाहणी करुन बोली बोलावी.द्रवनत्रपात्राच्या तफावतीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

20.द्रवनत्रपत्राचा लिलाव पुर्ण झाल्यानंतर मालाची उचल/ने-आण इत्यादी संपुर्ण बाबी विहीत नियमानुसर व संबंधीत विभागच्या देखरेखी खाली करण्यची जबाबदारी बोली धारकाची राहील.

21.लिलावातील सर्व द्रवनत्र पात्रे घेऊन जाण्याची जबाबदारी यशस्वी बोलीधारकाची राहील.

22.यशस्वी बोलीधारकांना आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन 3 दिवसच्या आत सर्व द्रवनत्रपात्राची उचलन/ने-आण इत्यादी संपुर्ण् बाबी पुर्ण कराव्या लागतील.

23.लिलावास अंतिम मंजुरी देणे अथवा लिलाव नाकारणे,स्थगीत करण्याचा किंवा लिलाव प्रक्रीया रद्द करण्याचा पुर्ण अधिकार लिलाव समितीस असेल तो सर्व बोलीधारकांस बंधनकारक असेल.

24.लिलावाच्या दरम्यान लिलावासंबंधी कोणत्याही प्रकारची वाद उदभवल्यास याबाबतचा अंतिम निर्णय हा लिलाव समिती यांचा असेल व सर्व बोलीधारकांस तो बंधनकारक राहिल.

25.लिलाव मंजुर झालेल्या बोलीधरकाने स्वःखर्चाने द्रवनत्र पात्रे चेपुन घ्यावी लागतील व त्या पात्रचा दुरुउपयोग करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

26.वरील अटी व शर्ती मंजूर असणा-या खरेदीदारालाच लिलावात भाग घेता येईल.

**लिलावाचे ठिकाण- जिल्हा कृत्रिम रेतन केंद्र परिसर,दर्गा रोड,परभणी.**

(डॉ.पी.पी.नेमाडे)
**अध्यक्ष,लिलावसमिती तथा**
**जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त,परभणी**